# चिपळूण नगर परिषद

फेर निवीदा सुचना

चिपळूण नगर परिषदेस खालील नमूद कामे करावयाची आहेत. सदर निविदा ही टक्केवारी पध्दतीने व दोन लखोटा पध्दतीने सिलबंद निवीदा दिनांक ३०/०८/२०१० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत नगर परिषद प्रशासकिय अधिकारी यांचे कक्षातील निवीदा बॉक्समध्ये टाकावी.

**ऑर्कीटेक्ट पॅनल तयार करणे.**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | कामाची मुदत | निविदा फॉर्मची किंमत | बयाणा रक्कम डि.डि./ मुदतठेवने |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाचे जागेला भेट देऊन योजनेचा उद्देश, आवश्यकता, सौदर्यदृष्टी वगैरे विचारात घेऊन आराखडे व अंदाजपत्रके तयार करणे. | कामाचे आदेश दिल्या पासून ३० दिवस | १०००/- | १०,०००/- |
| २ | नकाशे मान्यता, तांत्रिक मान्यता आणि प्रशासकिय मान्यता प्राप्त करणे. | | | |
| ३ | कामावर दररोज देखरेख करणे,(day to day supervision) | | | |
| ४ | बील नोदविणे वगैरे सर्व अनुषंगीक कामे करणे, | | | |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१. निविदा फॉर्म नगर परिषद एक खिडकी विभागामध्ये दिनांक २५ /०८ /२०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. निविदा पूर्व बैठक तारीख २७/०८/२०१० वेळ सायंकाळी ४.३० वाजता मुख्याधिकारी चिपळूण नगर परिषद यांचे चेंबर मध्ये होईल.
३. निविदा दोन लखोटा पध्दतीने भरावयाची असून लखोटा क्रमांक १ मध्ये पात्रता संबंधी कागदपत्रे तसेच निविदा अनामत रकाना क्रमांक ५ मधील रक्कमेचा मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे नांवे असलेला डि.डि. अथवा ठेव पावती किमान १ वर्ष मुदतीची ठेवणे आवश्यक आहे. तसेच लखोटा क्र.२ मध्ये दरपत्रक ठेवणेची आहे.
४. निविदा दिनांक ३०/०८/२०१० रोजी सायं.४.०० उपस्थित निविदा धारकांसमोर उघडणेत येईल.
५. निविदा भरणेपूर्वी निविदा फॉर्म व प्रारुप करारनाम्यामधील अटीचा अभ्यास करुन निविदा धारकांनी निविदा भरावयाची आहे. निविदा अपूर्ण आढळल्यास फेटाळण्यात येईल व दरपत्रक उघडले जाणार नाही.
६. सर्व अथवा कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांजकडे राखून ठेवणेत आला आहे.

निवीदा क्रमांक :- २०१००८००८ दिनांक :- १६/०८/२०१०

मुख्याधिकारी अध्यक्ष

चिपळूण नगर परिषद

**टीप :** सविस्तर निविदा सुचना नगर परिषदेचे www.cmcchiplun.org या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

## सविस्तर निविदा सुचना

१. बयाणा रक्कम डी.डी. किंवा मुदत ठेव किमान १ वर्षे मुदतीची स्विकारली जाईल. रोखीने स्विकारली जाणार नाही.

**२.** निविदा फॉर्म एक खिडकीमध्ये आवश्यकती रक्कम रोख भरल्यानंतर न.पा.च्या अभिलेख व भांडार विभागातून उपलब्ध होतील.

३. निविदा सादर करण्याची पध्दत

३.१ निविदा दोन स्वतंत्र लखोट्यात सिलबंद सादर करणे आवश्यक आहे.

३.२ निविदा लखोटा क्र.१ मध्ये बयाणा रक्कमेचे डी.डी/मुदत ठेव पावती, अनुभवाचे दाखले, संस्थेची व संस्थेमध्ये काम करणारे तज्ञ व्यक्तींची माहीती (कंपनी प्रोफाईल) अन्य काही माहीती कागदपत्र जोडावयाची असल्यास सर्व कागदपत्र सत्यप्रती लिपी (साक्षांकित) करणे आवश्यक आहे. निविदेसोबत कोणत्याही अटी शर्ती टाकावयाच्या असल्यास लखोटा क्र.१ मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

२.३ दोन्ही लखोट्यावर कामाचे नाव आर्किटेक्टचे नांव लिहून दोन्ही लखोटे सिलबंद करून लखोटा क्रमांक ३ मध्ये सिलबंद करुन सादर करणे आवश्यक आहे.

**२.४** आयकर पॅनकार्डच्या सत्यप्रती लिपी व वॅट रजिस्ट्रेशनचा दाखल्याची सत्यप्रत लिपी सोबत जोडणे आवश्यक आहे.

४. शासनाचे प्रचलीत नियम आणि बांधकाम नियमावली नुसार तपशिलवार बांधकाम नकाशे तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे व अंदाजपत्रकांना सक्षम प्राधिकारणाची नकाशे मान्यता, तांत्रिक मान्यता व प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.

५. प्राप्त निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदे मध्ये नमुद टक्केवारी दरानुसार सर्व निविदा धारक चिपळूण नगर परिषदेचे आर्कीटेक्ट पॅनल वर काम करणेस तयार असले बाबत विचारणा करणेत येईल व त्याप्रमाणे चिपळूण नगर परिषदेचे आर्कीटेक्ट पॅनल तयार केले जाईल.

६. आर्कीटेक्ट, इंजिनियर आणि इलेक्ट्रीकल इंजिनियर अशा विविध श्रेणींमधील तज्ञांचे पॅनल तयार करणेत येईल व संबंधीत श्रेणी तज्ञांना मा.कौन्सिल सभेचे मान्यतेने कामे देणेत येतील.

७. कामाची फि खालील प्रकारे अदा करणेत येईल.

१. डिझाईन सर्व्हीसेसच्या पुर्तते अपरांत ४० टक्के

२. सुपरव्हिजन व क्वॉलिटी कन्ट्रोल सर्व्हीसेस पुर्तते उपरांत ४० टक्के

३. मेजरमेंट व बिलींग सर्व्हीसेस उपरांत २० टक्के

८. कामाच्या ठिकाणी आवश्यकत्या नोंदवह्या ठेवणे व तपासणी आवश्यक वेळोवेळी सादर करणे आवश्यक आहे.

९. कामाच्या ठिकाणी काम सुरु असतांना दैनंदिन पर्यवेक्षण करणे आवश्यक आहे.

१०.नगर पालिके मार्फत ज्या वेळेस आर्मेत्रीत केले जाईल त्या वेळेस उपस्थीत राहणे बंधनकारक असेल.

११.कामामध्ये दिरंगाई व हलगर्जीपणा केल्यास नगर पालिकेमार्फत निश्चीत केलेल्या दरा नुसार दंड भरणे बंधनकारक असेल.

१२.प्रकल्पाचे नकाशे नगर पालिकेचे पुर्णपणे समाधान होईल त्या प्रमाणे तयार करुन देणे.

१३.काम जसजसे पुर्ण होईल त्यानुसार मड़तेदारांची बीले तयार करुन व तपासून देणेत येतील तसेच काम योग्य दर्जानुसार पूर्ण झाल्या बाबतचे प्रमाणपत्र देणेत येईल.

१४.काम सुरु असतांना काही बदल नगर परिषदेने सुचविल्यास त्या प्रमाणे त्या बदला नुसार आवश्यकते आराखडे व नकाशे तयार करुन आवश्यक मंजुरी घेऊन देणेची आहे.

मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद